MHKO100000542008

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ११/२००८</u>**

भैरु कांबळे-म.वा.- वगैरे.
विरुध्द
सखाराम कांबळे-म.वा.- वगैरे.

**<u>निशाणी क्र.९७ वर आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी त्यांचेविरुध्द झालेला "उलटतपास नाही" चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादींतर्फे अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हा हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. सदर कामी प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.७४ अन्वये दिनांक ०१/०२/२०२० रोजी दाखल केले आहे. त्यानंतर, दिनांक २७/०७/२०२२ रोजी साक्षीदाराचा पुढील सरतपास घेण्यात आला व प्रकरण उलटतपासासाठी पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आले. त्यानंतर, वादी यांना संधी देऊन देखील त्यांनी उलटतपास घेतला नाही, त्यामुळे त्यांचेविरुध्द दिनांक २७/०३/२०२४ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रकरण हे साक्षीदाराचे उलटतपासाकरीता ब-याच काळापासून प्रलंबीत आहे. त्याबाबत वादी यांनी असे कारण नमुद केले आहे की, दरम्यानचे काळात त्यांचे वकील एस.व्ही.पोवार हे ब्रेन स्ट्रोकने आजारी पडलेने त्यांना उपचारासाठी कोल्हापूर येथे दाखल करावे लागले. त्यामुळे, त्यांना तारखेस हजर राहून प्रतिवादी यांचा उलटतपास घेता आला नाही असे कारण नमुद केलेले आहे. परंतु, प्रकरणाची परिस्थिती व नमुद कारण पाहता सदर कारणे संयुक्तीक वाटत नाहीत. परंतु, दाव्याचे स्वरुप पाहता दावा गुणदोषावर निकाली काढणेकरीता वादी यांना बचावाची संधी देणेदेखील योग्य वाटते. वादी यांचेमुळे झालेला विलंब व त्यामुळे प्रतिवादी यांचे झालेले नुकसान याकरीता सदरचा अर्ज खर्चासह मंजुर करणे योग्य होईल. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**-:आदेश :-**

०१. अर्ज रक्कम रु. ५००/- (रुपये पाचशे फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम वादी यांनी पुढील तारखेपर्यंत साक्षीदार यांना अदा करावी. तसे न झाल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by RATHOD SUJIT
Date: 2024.07.31 17:38:38 +0530

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः ३०/०७/२०२४.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 30/07/2024 |
| Order signed by P.O. on | 30/07/2024 |
| Order uploaded on | 31/07/2024 |